स्वातंत्र्य सैनिकांच्या तसेच आजी-माजी
सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय, क्र. एनडीएफ/२००४/(६१३ /०४)/केंपुयो
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक : २५ ऑक्टोबर, २००४.

संदर्भ : १) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एमआयएस १४६५/एच, दि.२३.११.१९६५
२) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.एनडीएफ १०७२/२४८७/एस, दि. १०.११.१९७२
३) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एनडीएफ-१०७९/२२२९२० / (५३७)/साशि ५, दि. १४ जानेवारी १९८५
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एनडीएफ १०९४/(१६६८/९४)/साशि-५, दि. १३ सप्टेंबर १९९४.

शासन निर्णय :-

स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एमआयएस १४६५/एच, दि.२३.११.१९६५ अन्वये, आजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र.एनडीएफ १०७२/२४८७/एस, दि.१०.११.१९७२ अन्वये व माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती देण्याची योजना शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एनडीएफ-१०७९/२२२९२० /(५३७)/साशि ५, दि. १४ जानेवारी, १९८५ अन्वये कार्यान्वित आहे. सदर योजनेनुसार वर नमूद केलेल्या स्वातंत्र्य/आजी/माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना/पत्नींना/विधवांना राज्यातील मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांत शिक्षणाच्या सर्व स्तरावर (इ. १ली ते पदव्युत्तर स्तरापर्यंत) मोफत शैक्षणिक सवलत देण्यात आली आहे. सवलतीच्या दरांमध्ये शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एनडीएफ १०९४/(१६६८/९४)/साशि-५, दि. १३ सप्टेंबर १९९४ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. तत्कालिन शिक्षण व सेवायोजन विभागाचे मे १९९२ मध्ये " शालेय शिक्षण विभाग" व " उच्च व तंत्र शिक्षण विभाग" अशा दोन विभागांमध्ये विभाजन झाले आहे. त्यामुळे यापुढे उपरोक्त योजनेअंतर्गत या विभागाच्या अधिपत्याखालील इ. १ ली ते १२ वीच्या संबंधित विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षापासुन (सन २००५-०६) लाभ अनुज्ञेय राहील. इ. १२ वी नंतर

उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या लाभार्थी विद्यार्थ्यांबाबत पुढील शैक्षणिक वर्षापासून (सन २००५-०६) उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र. प्र. वळवी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
सचिव, महाराष्ट्र राज्य (सैनिक बोर्ड, कौन्सिल हॉल, पुणे)(व्यापक प्रसिध्दीकरिता)
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
तंत्र प्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, पुरातत्व व पुराभिलेख, महाराष्ट्र राज्य, मुंबई
ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
समाजकल्याण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
संचालक, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
शेतीसंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १-२, मुंबई/ नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १-२, मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
सर्व जिल्हयांचे कोषागार अधिकारी
पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई(योग्य ती प्रसिध्दी देण्याकरिता)
सर्व जिल्हयांच्या जिल्हा सैनिक मंडळाचे अध्यक्ष
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उपसंचालक
पोलीस आयुक्त, मुंबई.
सर्व जिल्हयांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,
शिक्षण निरीक्षक, मुंबई (दक्षिण, उत्तर आणि पश्चिम),
भारत सरकारचे सचिव, शिक्षण व समाजकल्याण मंत्रालय, नवी दिल्ली.
भारत सरकारचे सचिव,संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली.
मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री (शा.शि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (शा.शि.) यांचे खाजगी सचिव
शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व कार्यासने.
निवड नस्ती, केपुयो